## निवडक

### हणखणे श्री भराडी देवी देवस्थानची आज निवडणूक

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे तालुका मामलेदार देवस्थान प्रशासक यांनी देवस्थानच्या त्रैवार्षिक कालावधीसाठी २०२५– २८ सालासाठी हणखणे येथील श्री देवी भराडी देवस्थानची नवीन समितीसाठी रविवार ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बैठक आयोजित केली आहे.
ह्या अनुषागाने श्री देवी भराडी देवीच्या महाजनांनी बैठकीस उपस्थित राहून निवडणुकीत भाग घेण्याचे आवाहन केले आहे.

---

### केरी आजोबा देवस्थानचा उद्यापासून जत्रोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ८ : गोवा व अन्य राज्यात प्रसिद्ध श्री आजोबा देवस्थानचा ७६ वा जत्रोत्सव सोमवार १० फेब्रुवारीपासून उत्साहात व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. या निम्मित १० रोजी सकाळी ८ वा शुध्दीकरण, मंगळवार, दि. ११ रोजी सकाळी ५.३० वा अभिषेक,तीर्थप्रसाद, रात्री ८ वा 'स्वर आजोबा' हा गायन कार्यक्रम व रात्री ११ वाजता नाईक मोचेमाड कर यांचे दशावतारी नाटक होईल. बुधवार, दि. १२ रोजी संध्या ४ वा श्री सत्यनारायण महापूजा, आरती, तीर्थप्रसाद, संध्या ७ वाजता देवांच्या फळफळांची पावणी, रात्री १० वाजता ऑर्केस्ट्रा गोवन पॅराडाइज सादर होईल. दि. १३ रोजी संध्या ४ वा श्री सत्यनारायण महापूजा, नंतर आरती, तीर्थप्रसाद व संध्या ५.३० वा गोव्यातील नामवंत कलाकारांचे भजन होईल. दि. १४ रोजी संध्याकाळी ४ वा श्री सत्यनारायण पूजा आरती, तीर्थप्रसाद, रात्री ९ वा राजदीप नायक प्रस्तुत दोन अंकी कोकणी नाटक 'गाव झाला जानटो ' सादर होईल. शनिवार, दि. १५ रोजी संध्याकाळी ४ वाजता सत्यनारायण पूजा, आरती, तीर्थप्रसाद व रात्री ९ वा शिवशाखळेश्वर थिएटर्स प्रस्तुत गजंत तोरस्कर निर्मित दोन अंकी कॉमेडी नाटक चित्रविचित्र सादर होईल. भाविकांनी उपस्थित राहून श्री कृपेस पात्र व्हावे, असे आवाहन केले आहे.

---

### शिवोली गणेश मंदिरात ११ रोजी साप्ताहिक मंगळवार

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. ८ : तार शिवोली येथील गणेश मंदिरात दि. ११ फेब्रुवारी रोजी गणेश विश्वस्त मंडळाचा साप्ताहिक मंगळवार साजरा होणार आहे. साप्ताहिक मंगळवारचे यजमानपद अनिल आगरवाडेकर यांना लाभले आहे. त्यानिमित्त सकाळी अभिषेक, दुपारी महाप्रसाद आणि रात्री साडेसात वाजता श्रीराम महिला भजनी मंडळ आस्कावाडा मांद्रे यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आहे. यात जानवी म्हामल, रिया गोसावी, स्वाती गोवेकर, अदिती गडेकर भाग घेणार आहेत. त्यांना हार्मोनियमवर साथ सोहम म्हामल तर पखवाज सिद्धराज म्हामल साथ करतील.

---


### भूमिका सातेरी देवस्थानचा १७पासून जत्रोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ८ :** भूमिका सातेरी रवळनाथ देवस्थान गिरवडे देवीचा ५७ वा जत्रोसव दि. १७ते २६ फेब्रुवारीपर्यंत साजरा होणार आहे. दि. १७ रोजी सकाळी नऊ वाजता धार्मिक विधी होतील. संध्याकाळी सहा वाजता भूमिका सातेरी भजनी मंडळातर्फे भजनाच्या कार्यक्रम होईल. दि. १८ रोजी सकाळी धार्मिक विधी, संध्याकाळी आठ वाजता राष्ट्रोळी प्रासादिक नाट्य मंडळ गिरी यांच्यातर्फे कराओके गीत गायन स्पर्धा, दि. १९ रोजी सकाळी धार्मिक विधी व संध्याकाळी आठ वाजता भावधारा हा नाट्यगीत भावगीतांचा कार्यक्रम होणार आहे. दि. २० रोजी सकाळी धार्मिक विधी, रात्री आठ वाजता भजन, संध्या गायक शुभम नायक व साथी कलाकारांचा गायनाचा कार्यक्रम होईल. दि. २१ रोजी श्रीदेवीचा वाढदिवस, दि. २२ रोजी सकाळी पूजा, रात्री आठ वाजता नरशिर यज्ञ, दि. २३ रोजी 'बाळा जो जो रे' नाटक, दि. २४ रोजी सकाळी साडेनऊ वाजता सत्य अंबेची महापूजा कुंकूमार्जन, रात्री आठ वाजता नाटक देहत्याग, दि. २५ रोजी सकाळी साडेनऊ वाजता पूजा, आरती, तीर्थप्रसाद व रात्री कोकणी नाटक आंकवार कंपनी हे होईल. दि. २६रोजी सकाळी धार्मिक विधी व नऊ वाजता बार्देश तालुका मर्यादित नृत्य व वेशभूषा स्पर्धामक कार्यक्रम होणार आहे.

---

### विद्यार्थ्यांनी सोशल मीडिया वापरताना काळजी घ्यावी : निखिल माळगी



■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ८ : सध्याचा युगात सोशल मीडिया प्लॅटफॉर्म बराच तेजगतीने वापरात असल्याने अनेकजणांना त्याचा फटका बसला आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांनी ह्याचा वापर करताना मोठी काळजी घ्यावी व वापर करण्याचे आवाहन जेट किंग आस्थापनाचे निखिल मालगी यांनी केले. सप्तेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात बोलत होते. सायबर सेल बाबत वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरून लोकांना लुटतात याचे उदाहरण त्यांनी पटवून दिले. हॅकिंग आणखीन एक प्रकार असून संपूर्ण खाते व सोशल मीडिया खाते पूर्णत हॅक करण्याच्या केसेस वाढल्या असल्याने वापरताना काळजी घेण्याची गरज जोपासली पाहिजे,असे मत मालगी यांनी व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी प्रश्नोत्तरे कार्यक्रम झाला.यावेळी व्यासपीठावर प्राचार्य अरुण नाईक, जेट किंगचे मिरान खान व कार्यक्रम प्रमुख प्रा. श्रीराम कलशावकर उपस्थित होते. शेवटी त्यांनी आभार मानले.

# भारत-इंग्लंड आज दुसरा वनडे

## रोहित शर्माला डच्चू? : विराट कोहलीचे कमबॅक होणार



**कटक, दि. ८ :** भारत विरुद्ध इंग्लंडमधील दुसरा एकदिवसीय सामना उद्या रविवारी दुपारी १.३० वाजता कटक येथे होणार आहे. पहिल्या सामन्यात शानदार विजय मिळविल्याने भारतीय संघाच्या भुवया उंचावलेल्या असून उद्याचा सामना जिंकून विजयी लय कायम ठेवण्याच्या इराद्याने टीम इंडिया मैदानात उतरणार आहे. कर्णधार रोहित दुसऱ्या सामन्यासाठी युवा खेळाडूला प्लेइंग ईलेव्हनमधून डच्चू देऊ शकतो.

विराट कोहली याला पहिल्या सामन्यात गुडघ्याच्या दुखापतीमुळे खेळता आले नाही. त्यामुळे यशस्वी जयस्वाल आणि हर्षित राणा या दोघांना पदार्पणाची संधी मिळाली. हर्षितने या संधीचं सोनं करत उल्लेखनीय कामगिरी केली. मात्र यशस्वीला छाप सोडता आली नाही. यशस्वीला पदार्पणातील सामन्यात काही खास करता आले नाही.

यशस्वीने नागपुरात झालेल्या सलामीच्या सामन्यात यशस्वीसह ओपनिंग केली. मात्र यशस्वी १५ धावा करुन माघारी परतला. त्यामुळे यशस्वीला दुसऱ्या सामन्यातून डच्चू दिला जाऊ शकतो.

कटकमधील बाराबती स्टेडियमवर हा सामना खेळला जाणार आहे. या मैदानाची खेळपट्टी फिरकी गोलंदाजांना खूप मदत करते. फिरत्या चेंडूंविरुद्ध फलंदाजांना धावा काढणे खूप कठीण असते. चेंडू बॅटवर अडकतो. फिरकी गोलंदाजांसोबतच वेगवान गोलंदाजांनाही सुरुवातीला विकेटवरून मदत मिळते. म्हणजेच कटकच्या या मैदानावर फलंदाजांना प्रत्येक धावेसाठी संघर्ष करावा लागतो.

बाराबती स्टेडियममध्ये आतापर्यंत एकूण २७ एकदिवसीय सामने झाले आहेत. यापैकी ११ सामन्यांमध्ये प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने विजय मिळवला आहे. त्याच वेळी, १६ सामन्यांमध्ये धावांचा पाठलाग करणाऱ्या संघाने मैदानात उतरले आहे. म्हणजे या मैदानावर नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेणे अधिक फायदेशीर ठरते. पहिल्या डावातील सरासरी धावसंख्या २२९ आहे. तर, दुसऱ्या डावात सरासरी धावसंख्या २०१ आहे. इंग्लंडविरुद्ध खेळताना भारताने ५० षटकांत ३८१ धावा केल्या होत्या, जो या मैदानावरील सर्वोच्च धावसंख्या देखील आहे. यासोबतच टीम इंडियाने वेस्ट इंडिजविरुद्ध १८९ धावांचा बचावही केला आहे.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने एकदिवसीय मालिकेची सुरुवात दणदणीत विजयाने केली. नागपूरमध्ये, हर्षित राणाच्या धारदार गोलंदाजी आणि जडेजाच्या फिरकी गोलंदाजीसमोर ब्रिटीश संघ सहज बाद झाला आणि संपूर्ण संघ २४८ धावा करून सर्वबाद झाला. भारतीय संघाने २४९ धावांचे लक्ष्य केवळ ३८.४ षटकांत केवळ ६ गडी गमावून पूर्ण केले. फलंदाजीत, शुभमन गिलने संघाकडून ८७ धावांची शानदार खेळी केली, तर श्रेयस अय्यरने ५९ धावांचे योगदान दिले. त्यामुळे उद्याच्या सामन्यात गिल, अय्यरकडून मोठ्या खेळीची संघाला अपेक्षा असेल.

दुसरीकडे, टी– ट्वेंटी मालिका गमाविल्यानंतर वनडे मालिकेतील पहिला सामनाही इंग्लंडने गमाविला. त्यामुळे पहिल्या सामन्यातील पराभवाचा वचपा काढण्याच्या इराद्याने इंग्लंडचा संघ मैदानात उतरेल. कोणत्याही परिस्थितीत जोस बटलर संघाकडून उत्कृष्ट कामगिरी करून घेण्याच्या तयारीत असेल. तसेच दुसरा सामना जिंकून मालिकेत बरोबरी साधण्याचा इंग्लंडचा प्रयत्न असेल.

**संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :**

**भारत :** रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल (उपकर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, लोकेश राहुल, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंह, यशस्वी जयस्वाल, रिषभ पंत, रवींद्र जडेजा आणि हर्षित राणा.

**इंग्लंड :** जोस बटलर (कर्णधार), जोफ्रा आर्चर, गस ॲटकिन्सन, जेकब बेथेल, हॅरी ब्रूक, ब्रायडन कार्स, बेन डकेट, जेमी ओव्हरटन, लियाम लिव्हिंगस्टोन, आदिल रशीद, जो रूट, साकिब महमूद, फिल सॉल्ट आणि मार्क वुड.



राजेंद्र प्रभुदेसाई यांच्याकडून मॅन ऑफ द मॅच पुरस्कार स्वीकारताना सनत म्हापणे. सिद्धित पै रायतुरकर यांच्याकडून हिरो ऑफ द मॅच पुरस्कार स्वीकारताना वर्धन प्रभू मिस्किन.

## काणकोण मठग्राम युनायटेड, प्रायॉरिटी टायटन्स विजयी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ८ : गोवा जीएसबी स्पोर्ट्स अँड चॅरिटेबल ट्रस्ट यांनी गोवा सारस्वत समाज यांच्या सहकार्याने आयेजित केलेल्या आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी–२० स्पर्धेत शनिवारी मडगावच्या एमसीसी मैदानावर काणकोण मठग्राम युनायटेड व प्रायॉरिटी टायटन्स यांनी एकतर्फी विजयांची नोंद केली. काणकोण मठग्राम युनायटेडने रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुजचा ८ गडी राखून पराभव केला. रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुजचा डाव १९.४ षटकांत ११५ धावांत संपवल्यानंतर काणकोण मठग्राम युनायटेडने केवळ १०.५ षटकांत २ बाद ११९ धावा करत शानदार विजय साकार केला. फलंदाजीत ४० धावा व १७ धावांत ३ गडी बाद केलेला विराज पुराणिक मॅन ऑफ द मॅच ठरला. युनायटेडचा ४ सामन्यांतील हा तिसरा विजय होता. दुसरीकडे, प्रायॉरिटी टायटन्सने २० षटकांत ६ बाद २२३ धावांचा डोंगर उभा केला. यानंतर त्यांनी लझिज सीक्यूएसचा डाव १७.३ षटकांत १२३ धावांत गुंडाळताना १०० धावांनी विजयाला गवसणी घातली. २५ धावांत ५ विकेट्स घेतलेला लेगस्पिनर मनीष पै काकोडे मॅन ऑफ द मॅच ठरला. टायटन्सचा ५ सामन्यांतून हा चौथा विजय ठरला. मोठ्या फरकाने मिळविलेल्या या विजयांमुळे युनायटेड व टायटन्सच्या निव्वळ धावगतीला बळकटी मिळाली आहे.

**संक्षिप्त धावफलक**

रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुज यूसी – १९.४ षटकांत सर्वबाद ११५ (साईश प्रभू देसाई २९, अश्विन कुंकळ्येकर १८, प्रशील कामत १४, विराज पुराणिक १७–३, सुमिरन आमोणकर १९–२, वृषभ कुंकळ्येकर १९–१, कौंतेय शेणवी १५–१) पराभूत वि. काणकोण मठग्राम युनायटेड – १०.५ षटकांत २ बाद ११९ (विराज पुराणिक ४०, सुकृत पै ३४, सुमिरन आमोणकर नाबाद ३२, विश्लेश शेणवी २३–१)

प्रायॉरिटी टायटन्स – २० षटकांत ६ बाद २२३ (सिद्धेश आमोणकर ३९, वेद महांबरे ३६, व्यंकट बिचे २७, प्रणव बिचे नाबाद २७, दीप भेंडे २८–१, ईशान होडारकर ३०–१, लक्ष्मीकांत कुराडे २८–१) विजयी वि. १७.३ षटकांत सर्वबाद १२३ (देवल करमली २६, रावजी काकोडकर २२, सर्वेश प्रभुगावकर १९, मनीष काकोडे २५–५, कपिल सिनाय बोरकर १७–३, विक्रांत प्रभू २५–१, वेद महांबरे ९–१)

## आतिथ्य सेवा क्षेत्रातील उद्योजकता विषयावरील कार्यशाळा उत्साहात

**आंबिये महाविद्यालयाचा पुढाकार; सावंतवाडीतील एमएआयमध्ये आयोजन**

■ टीम दैनिक हेराल्ड



पर्वरी, दि. ८ : संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथील भूगोल विभाग, पदव्युत्तर वाणिज्य विभाग आणि पीआयएनई इनक्युबेशन सेंटर आणि सावंतवाडी येथील लोकमान्य ट्रस्टच्या एमएआय इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, सावंतवाडी महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आतिथ्य सेवा क्षेत्रातील उद्योजकता या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र आणि कार्यशाळेचे आयोजन एमएआय इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, सावंतवाडी येथे दि. १ फेब्रुवारी रोजी करण्यात आलेले होते. आतिथ्य सेवा क्षेत्रातील करियरच्या संधी जाणून घेणे आणि व्यावहारिक अनुभव विद्यार्थ्यांना प्रदान करणे हा या कार्यशाळेचा हेतू होता. भूगोल विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. ईशानी रॉय आणि वाणिज्य विभागातील मायरॉन परेरा यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन केलेले होते.

**प्राचार्य अनिरुद्ध दास यांचे बहुमूल्य मार्गदर्शन**

एमएआय इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटचे प्राचार्य अनिरुद्ध दास यांनी आतिथ्य सेवा क्षेत्रातील करियरच्या संधींबद्दल सादरीकरणासह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी हॉटेल व्यवस्थापन, अन्न आणि पेय सेवा, कार्यक्रम नियोजन आणि आतिथ्य सेवा क्षेत्रातील उद्योजकता या घटकांबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

**कार्यशाळेतील ठळक बाबी**

१.या कार्यशाळेत स्वयंपाक तंत्र, घटक, विविध प्रकारच्या पाककृतीचे प्रदर्शन याची माहिती मिळण्याबरोबरच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाककृती तयार करण्याचा अनुभव मिळाला. २.कुकीज, कपकेक्स आणि केक तयार करण्याची प्रक्रिया, तसेच बेकींग कौशल्य, तसेच मॉकटेल बनवण्याची विद्यार्थ्यांना संधी मिळाली आणि पेय व्यवस्थापनाची व्यावहारिक समज वाढली. ३. या कार्यशाळेत संत सोहिरोबानाथ आंबिये महाविद्यालयातील २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## शाळेतूनच विद्यार्थी सुसंस्कृत घडतात : परब

**लोकशिक्षण हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात**

■ टीम दैनिक हेराल्ड



पेडणे, दि ८ : शाळा म्हटल्यानंतर त्या शाळेतून शिकणारे विध्यार्थी चांगले घडत असतात सुसंस्कृत होतात. त्याचे श्रेय त्या शाळातील शिक्षकांना आणि आपसूकच विद्यार्थ्यांच्या पालकांना आणि संस्था चालकांना मिळते. लोकशिक्षण संघटनेला आणि हायस्कूल ५७ वर्षाचे झाले. हे कळलेच नाही. त्यांनी आज शिक्षण क्षेत्रात मोठी प्रगती केली आणि गावातीलच न्हवे तर पेडणे तालुक्यात आपले वर्चस्व दाखविले. त्याबद्दल या सर्वांचे कौतुक करावे तेवढे कमीच असल्याचे प्रमुख पाहुणे या नात्याने बोलताना फाऊंडर ऑफ ऊर्जा फाउंडेशनचे संस्थापक दुर्गादास परब यांनी प्रतिपादन केले.

धारगळ येथील लोकशिक्षण प्रिप्रायमरी, प्रायमरी आणि हायस्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कार्यक्रमावेळी प्रमुख पाहुणे या नात्याने दुर्गादास परब बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत व्यासपीठावर खास अतिथी म्हणून धारगळ पंचायतचे सरपंच सतीश धुमाळ, अध्यक्षस्थानी लोकशिक्षण संघटनेचे चेअरमन विकास प्रभुदेसाई, व्हाईस चेअरमन प्रकाश धुमाळ, मुख्याध्यापिका जस्मिनी मांद्रेकर, सचिव रविचंद्र हरमलकर, खजिनदार दीपक कोलवाळकर, सदस्य उज्वल हळबे, हायस्कूल पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष सिद्धेश धारगळकर प्राथमिक विद्यालयाचे अध्यक्ष सर्वेश कारापुरकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

सरपंच सतीश धुमाळ म्हणाले की, स्नेहसंमेलन हे विध्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे असते. विद्यार्थ्यांसाठी ही एक परवणी असते. विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन आपल्या शाळेचे, शिक्षकांचे, आई वडिलांचे व गावाचे नाव उंच शिखरावर न्यावे.

संस्थेचे चेअरमन विकास प्रभुदेसाई यांनी सांगितले की, आमच्या दहा वर्षाच्या कालावधीत संस्थेच्या कार्यकारणीने बरीचशी कामे पूर्ण केली. फक्त नव्याने हाती घेण्यात आलेल्या इमारतीचे बांधकाम व क्रीडा मैदान सरकारी अडथळ्यामुळे सध्या स्थगित ठेवण्यात आले आहे. पण त्याचे काम लवकरच हाती घेण्यात येणार असल्याचे सांगितले व येणाऱ्या काळात ते पूर्णही केले जाईल, असे ते म्हणाले. शैक्षणिक क्षेत्रात या हायस्कूल प्रगती पथाकडे नेले जाईल आणि यापुढेही नेण्याचे आमचे ध्येय असल्याचे ते म्हणाले. विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे दुर्गादास परब, सरपंच सतीश धुमाळ, चेअरमन विकास प्रभुदेसाई, व्हाईस चेअरमन प्रकाश धुमाळ, सिद्धेश धारगळकर व सर्वेश कारापुरकर व इतर पदाधिकारी यांच्या हस्ते बक्षिसे वितरित करण्यात आली.

# प्रशिक्षण ही नियमित चालणारी प्रक्रिया..!

## संचालक भूषण सावईकर : पणजीत एमटीएस कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. ८ :** काळाप्रमाणे नवी तंत्रे, काम करण्याच्या नव्या पद्धती यांचा उदय होत असतो. या नव्या पद्धती, नवी तंत्रे यांचे उपयोजन कामात होणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रशिक्षण हवे असते. प्रशिक्षण ही निरंतर आणि नियमितपणे चालणारी प्रक्रिया आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उपयोग कार्यालयीन कामकाजात व्हायलाच व्हावा, त्याशिवाय तो वैयक्तिक जीवनातही व्हायला हवा, असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर यांनी केले.

उच्च शिक्षण संचालनालय, गोवा सरकार यांनी मल्टीपर्पज सभागृह, संस्कृती भवन, पाटो–पणजी येथे या विषयावर एमटीएस कर्मचाऱ्यांसाठी आयोजित केलेल्या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनसत्रात संचालक भूषण सावईकर बोलत होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रशिक्षक दिलीप परब यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण कार्यक्रमाचे मुख्य आयोजक अशांक देसाई यांनी आयोजनामागचा हेतू प्रास्ताविकात स्पष्ट करून मुख्य मार्गदर्शक दिलीप परब यांची ओळख करून दिली. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन उच्च शिक्षण संचालनालयाचे सहायक संचालक अशांक देसाई यांनी केले. त्यांना नीमा राणे, पराश घार्से यांनी सहकार्य केले.

तज्ज्ञ प्रशिक्षक दिलीप परब म्हणाले की, कर्मचाऱ्यांमध्ये उमेद असली पाहिजे. उमेद असलेल्या कर्मचाऱ्यांनी आपल्या कामाचे ध्येय निश्चित केले की त्या कामात यश येते. काम आनंदाने केल्यास कामातून आनंद घेता येतो. जिथे वेदना आहे तिथे यश आहे. त्यामुळे अत्यंत कठीण परिस्थितीवरही मात करून कामाचे व्यवस्थापन केले पाहिजे.

**प्रशिक्षक दिलीप परब यांचे बहुमूल्य मार्गदर्शन**

**अर्थपूर्ण मांडणी, समर्पक उदाहरणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, संवाद कौशल्य, टीम वर्क, ताणतणाव विरहीत कामकाजाचे व्यवस्थापन, स्वपरीक्षण, सर्जनशीलता आदी विषयांची मांडणी, स्वाध्याय, व्हिडिओ सादरीकरण, गट चर्चा, खेळ आदी साधनांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ प्रशिक्षक दिलीप परब यांनी बहुमूल्य मार्गदर्शन केले.**

**एमटीएस कर्मचाऱ्यांनी घेतला अविस्मरणीय अनुभव**

एमटीएस कर्मचारी हा प्रशासनातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्याची तत्परता ही त्या खात्याचा लौकिक वाढवत असते. उच्च शिक्षण संचालनालयातील प्रशिक्षण आणि विकास विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षणाची संकल्पना गरुडझेप अशी होती. या प्रशिक्षणातून एमटीएस कर्मचाऱ्यांनी गरुडझेपेचा अविस्मरणीय अनुभव घेतला.

**३० कर्मचाऱ्यांचा सहभाग**

उच्च शिक्षण संचालनालयाचे सहायक संचालक अशांक देसाई यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमाचे नेटके आणि सूत्रबद्ध नियोजन केल्यामुळे हा प्रशिक्षण कार्यक्रम वैशिष्ट्पूर्ण ठरला. उच्च शिक्षण संचालनालयातील एकूण ३० एमटीएस कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणात सहभाग घेतला.

## नारायण देवस्थानचा उद्या वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ८ :** खालचावाडा येथील श्री नारायण देवस्थानचा ३० वा वर्धापनदिन सोहळा सोमवार, दि. १० फेब्रुवारी रोजी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. या दिनी सकाळी श्रीस अभिषेक, लघुरुद्र, श्री विष्णू याग, आरती, तीर्थप्रसाद व महाप्रसाद होईल. संध्या ७.३० सुहसिनीच्या दिवजासहित पालखी मिरवणूक होईल. त्यानंतर रात्री ९.३० वाजता क्षत्रिय मराठा समाज हौशी तरुण नाट्य मंडळातर्फे उत्तम मुरारी जिवाजी लिखित संतकालिन संगीत तारिले अभंग इंद्रायणीने सादर होणार आहे. या नाटकाचे दिग्दर्शन प्रशांत पेडणेकर, सूत्रधार हेमंत बांदेकर, सहाय्यक सुधीर रेडकर, गोविंद फटनाईक, नेपथ्य मंथन बांदेकर, पार्श्वसंगीत राम खवणेकर, संगीत दिग्दर्शक सुजय तिळवे , तबला राजीव गावकर, पार्श्वसंगीत मुन्ना,मंथन, मंजिरी गजानन तारी,रंगमंच किरण कला केंद्र, मये,ध्वनी शिरोडकर बांदा यांची आहे. या नाटकात निखिल पेडणेकर, गौरव वळवईकर, शौर्या तारी, स्मिता गोकर्णकर, रोहित गोकर्णकर, अंश गोकर्णकर, कृष्णा पेडणेकर, सोहम रेडकर, मयुरी दाभोलकर, गोविंद पेडणेकर, महेश गोकर्णकर व दत्तराज खोर्जे तर साथी कलाकार मधुकर गोकर्णकर,सुरेश खवणेकर,पांडुरंग रेडकर, दिगंबर गोखले,दीप गोकर्ण कर, सोहम ओटवणेकर, अजय माज्री, दिपराज घाटवळ, दुर्वांक दाभोलकर, वृषभ फटनाईक, सदानंद दाभोलकर, स्वस्तिक

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १५७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 157 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .